# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११/११/२०१६

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)

विषय :- नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०१६
चिन्ह वाटपाबाबत...

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ११/११/२०१६ रोजी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक असून नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकानंतरच्या दिवशी चिन्ह वाटप करावयाचे आहे. चिन्ह वाटपाच्या अनुषंगाने काही जिल्हाधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून काही मुद्दयांबाबत राज्य निवडणूक आयोगाकडे दूरध्वनीवरुन विचारणा करण्यात येत आहे. याबाबत खालील प्रश्न व त्यांचा खुलासा करण्यात येत आहे.

**प्रश्न १ -** चिन्ह वाटप कोणत्या क्रमाने होईल ? प्रथम अध्यक्ष पदाचे की सदस्य पदाचे ?

**उत्तर -** प्रथम अध्यक्ष पदाकरिता चिन्ह वाटप करावे. त्यानंतरच सर्व प्रभागातील सदस्य पदांचे चिन्ह वाटप होईल. अध्यक्ष पदाच्या नामनिर्देशनपत्राबाबत अपिल असल्यास अपिलाचा निर्णय झाल्यानंतरच अध्यक्ष पदाच्या चिन्ह वाटपाच्या दिवशी सर्व प्रभागातील सदस्य पदांचे चिन्ह वाटप करावे.

**प्रश्न २ -** अध्यक्ष व सदस्य पदाच्या नामनिर्देशनपत्रासंदर्भात अपिल झाले असल्यास अपिलाच्या निर्णयानंतर तिसऱ्या दिवसापर्यंत उमेदवारी मागे घेता येते. हा दिवस सुट्टीचा असल्यास काय करावे ?

उत्तर - अध्यक्ष व सदस्य पदाच्या निवडणुकांच्या बाबतीत अपिल झाल्यास निवडणूक नियमातील तरतुदीनुसार नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा तिसरा दिवस हा सुट्टीचा दिवस येत असल्यास त्यानंतर येणाऱ्या लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घ्यावीत.

प्रश्न ३ - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-२००९/प्र.क्र.४९/का.११, दि. ०४/०२/२०१२ नुसार बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एका प्रभागामध्ये एकापेक्षा जास्त अपक्ष उमेदवारांना त्याच प्रभागात समान चिन्ह वाटप करावयाचे नाही. अध्यक्ष पदाची निवडणूक सदस्य पदासोबतच घ्यावयाची असल्याने सदस्य पदाकरिताच्या अपक्ष उमेदवारांना वाटप करण्यात आलेले चिन्ह अध्यक्ष पदाच्या अपक्ष उमेदवारांना वाटप करता येईल किंवा कसे ?

उत्तर - एकाच प्रभागामध्ये एकापेक्षा जास्त उमेदवारांना, तसेच अध्यक्ष पदाकरिता आणि सदस्य पदाकरिताच्या अपक्ष उमेदवारांना समान चिन्ह देता येणार नाही.

प्रश्न ४ - अध्यक्ष पदाच्या नामनिर्देशनपत्राबाबत अपिल झाले असल्यास अध्यक्ष व सदस्य पदाकरिताचे चिन्ह वाटप केव्हा करावे ?

उत्तर - अध्यक्ष पदाकरिता अपिल झाले असल्यास अपिलाच्या निर्णयानंतर अध्यक्ष पदाकरिता उमेदवारी मागे घेण्याचा तिसरा दिवस हा सुट्टीचा असल्यास त्यानंतर येणाऱ्या लगतच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी माघार घेण्याचा दिनांक असेल. तसेच त्यानंतर लगतच्या दिवशी अध्यक्ष पदाकरिता चिन्ह वाटप करावे. तसेच सदस्य पदाचेही चिन्ह वाटप लगेचच करावे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(ध. मा. कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\DS-Kaned\नप निवडणूक नोव्हेंबर २०१६.docx.RSK